## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २६६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०५/२०१८

**१) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक २०/०५/२०१८ चे १४.३९ वाजता दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचा गाव नात्याने दिर लागत असुन नेहमी घरी येत जात होता यातील फिर्यादी ही आपले अंगणात एकटी बसली असतांना आरोपी हा तेथे येवुन फिर्यादीला पिण्याकरीता पाणी मागीतले असता फिर्यादी ही आरोपीला पाणी देण्याकरीता घरात गेली असता आरोपी फिर्यादीच्या मागे जावुन तिचा हात पकडुन विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,३५४(अ)४४८,४५२ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) महिलेस काठीने मारून दुखापत करून पुढे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:--**

दिनांक १४/०५/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा नातु पंकज हा घरी खेळत असता आरोपीने त्याला काठीने मारले असता फिर्यादीने तु विना कारण लहान मुलाला कशाला मारलास असे म्हटले असता आरोपीने तु बोलनारी कोण होतेस तु माझ्या घरी राहू नको म्हणुन भांडण शिवीगाळ करुन काठीने फिर्यादीचे डावे हाताचे मनगटावर मारुन दुखापत केली व पुढे मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादी श्रीमती विटाबाई रामलाल फुलबांधे वय ६० वर्ष, रा. मांडवी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२५,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) कायदेशीर रित्या शासनाची परवानगी न घेता एकत्र जमा होवुन नारेबाजी करून आचार सहितेचा भंग केल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक २१/०५/२०१८ चे २१.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हे घटणा ता. वेळी ठिकाणी कायदेशीर रित्या शासनाची परवानगी न घेता एकत्र जमा होवुन नारेबाजी करून मा. जिल्हाधीकारी साहेब यांचे महाराष्ट्र पोलीस अधीनीयम २२ कलम ३७ (१) (३). मपोका. अन्वये आचारसहितेचा भंग केल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. खाडे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८८ भादवी. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहेत.

**४) बिना परवाना जाहीरात लावुन सार्वजनीक मालमत्तेचे विदूपीकरण केल्याने गुन्हा नोंद :--**

दिंनाक १४/०५/२०१८ चे ०८.०५ वाजता यातील आरोपीने नगरपरीषदेचा शहरातील बसस्थानक व शास्त्री चौकातील होर्डीगवर बिना परवाना जाहीरात लावुन सार्वजनीक मालमत्तेचे विदृपीकरण केल्याने सरतर्फे फिर्यादी गनेश अमृत राव कपाटे वय २५ वर्ष रा. नगरपरीषद भंडारा संगणक अभियंता यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३ सार्वजनीक मालत्तेचा विदृपीकरण कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिरडकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) धारदार चाकुने वार करून गंभिर जखमी करून खिशातुन बळजबरीने नगदी पैसे काढुन नेल्याने गुन्हा नोंद:--**

दिनांक २२/०५/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नितीन लक्ष्मण उराळे वय २२ वर्ष, रा. माकडे मोहल्ला बडा बाजार भंडारा हा मुस्लीम लायब्ररी चौकातुन पोस्ट ऑफीस चौकाकडे जात असता यातील दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीस रस्त्यात अडवुन फिर्यादीचे गळयावर, पाठीवर धारदार चाकुने वार करून गंभिर दुखापत करून फिर्यादीचे खिशातुन बळजबरीने नगदी ३,०००/रु. काढुन नेल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३९४,३९७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) मोटार सायकलची चोरी :--**

दिनांक ०३/०५/२०१८ चे २१.०३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा एनचए ६ रोडने भंडारा येथुन लव्हारी येथे आल्यावर त्याची प्रकृती बिघडल्याने त्याने त्याची बजाज मोटार सायकल क्र.एमएच ३६ एसी ४५२६ कि. ३०,०००/रु. ही स्टॅन्डवर लावुन जांभळी फाटा येथे बाजुला जावुन बसला असता कोणीतरी अज्ञात चोराने मोटार सायकल चोरून नेल्याने फिर्यादीने आज पर्यत शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादी गुलाब बन्सी कटनकर वय ४२ वर्ष रा. लव्हारी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**७) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :--**

दिनांक ०६/०५/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील मृतक राजकुमार लाखडु वाघाडे वय ४० वर्ष रा. विरसी हा त्याचे घरी झोपेतुन उठुन बाथरूमला जात असता, अचानक तोल गेल्याने तो उभ्या सायकलवर पडला असता त्यास डावे डोळयाजवळ व डोक्याला मार लागल्याने त्यास घरचे लोंकानी औषधोपचारा करीता सरकारी दवाखाना साकोली येथे प्रथमोपचार करून नंतर चंदवानी दवाखाना साकोली येथे नेवुन उपचार करून पुढील उपचारा करीता, मेडीकल कॉलेज नागपुर येथे औषधोपाचारा करीता दिनांक ०७/०५/२०१८ चे २१.३१ वाजता दरम्यान भरती केले असता, उपचारादरम्यान दि. ०९/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान मरण पावल्याने पोलीस स्टेशन अजनी येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मडावी पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**८) उन्हामुळे चक्कर येवुन रस्त्यावर पडुन महिलेचा मृत्यु. :--**

दिनांक २२/०५/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीमती शेवंता बाजीराव मेश्राम वय ६५ वर्ष रा. खैरी पिंपळगाव ही रोजगार हमीचे कामावरून घरी परत येत असता, रस्त्यावर उन्हामुळे चक्कर येवुन पडुन जागीच मरण पावल्याने फिर्यादी सुमित संजय मेश्राम वय १९ वर्ष रा. खैरी पिंपळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**९) हातभट्‌टी दारु/ जुगार अडड्यांवर धाडी . :--**

दिनांक २२/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, करडी, तुमसर व साकोली येथे हातभट्‌टी दारू/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७५ लिटर हातभंट्‌टी दारू + १२५ किलो सडवा मोहा +साहीत्य किंमती १४,०००/--रु. तसेच जुगारातुन किंमती ३१८३/--रु. असा एकुण किंमती १७,१८३/--रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :--**

दिनांक २२/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक-- ०२ तीन सिटर वाहनाकरीता-- ०६ ईतर वाहनांवरती -- ९० केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.